सामूहिक प्रोत्साहन योजना, २००७ अंतर्गत
विशाल प्रकल्पांचा गुंतवणूक कालावधी
निश्चित करण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन
## उद्योग, उर्जा व कामगार विभाग
## शासन परिपत्रक क्रमांकः साप्रोयो-२०१३/प्र.क्र. ५४/उद्योग-८

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १२/८/२०१३.

वाचा -

१) **शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक- पीएसआय-१७०७/प्र.क्र. ५०/उद्योग-८, दिनांक ३० मार्च, २००७**
२) **शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक- पीएसआय-२०१३/प्र.क्र. ५४/उद्योग-८, दिनांक १/४/२०१३**

**परिपत्रक -**

प्रचलित पध्दतीनुसार विशाल प्रकल्पांना गुंतवणूकीचा कालावधी साप्रोयो, २००७ च्या सुरुवातीच्या दिनांक १/४/२००७ पासून/ देकार पत्राच्या दिनांकापासून/ सामंजस्य कराराच्या दिनांकापासून/ साप्रोयो, २००७ च्या कालावधीत पात्र होणाऱ्या कोणत्याही दिनांकापासून किंवा विशाल प्रकल्पासाठी शासनाकडे केलेल्या अर्जाच्या दिनांकापासून अनुज्ञेय करण्यात येतो. प्रकल्पाच्या स्थिर भांडवली गुंतवणूकीमध्ये प्रकल्पासाठी संपादन केलेल्या जमिनीच्या किंमतीचा समावेश आहे. तथापि प्रकल्पासाठी जमीन संपादन करण्यास काही कालावधी जात असल्यामुळे आणि गुंतवणूकीचा कालावधी वरीलप्रमाणे अनुज्ञेय केल्यामुळे प्रकल्पास देय असलेला ५ वर्षाचा संपूर्ण गुंतवणूक कालावधी मिळत नाही. त्यामुळे प्रकल्पास नियोजित गुंतवणूक (Planned Investment) विहित कालावधीत करता येत नाही. सामूहिक प्रोत्साहन योजना, २००७ मधील ४.१ व सामूहिक प्रोत्साहन योजना, २०१३ मधील परिच्छेद ७.१ मध्ये नमुद केल्यानुसार घटकांने सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत पात्र होण्यासाठी सर्व परिणामकारक टप्पे पुर्ण करुन योजनेच्या समाप्तीच्या दिनांकापर्यंत (साप्रोयो, २००७ करीता दिनांक ३१/३/२०१३ व साप्रोयो, २०१३ करीता दिनांक ३१/३/२०१८ पुर्वी( अंमलबजावणी यंत्रणेकडे अर्ज करणे आवश्यक असून या अर्जाच्या दिनांकापासून गुंतवणूक कालावधी देय आहे.

२.	त्याचप्रमाणे साप्रोयो, २००७ अंतर्गत विशाल प्रकल्पाला देकार पत्र देण्यात आले असेल मात्र अशा प्रकल्पांनी साप्रोयो, २००७ मधील परिच्छेद ४.१ मध्ये नमुद केल्यानुसार अंमलबजावणी यंत्रणेकडे पात्रतेसाठी अर्ज केला नसेल तर अशा घटकांना सामूहिक प्रोत्साहन योजना, २०१३ मधील परिच्छेद ७.१ (३) मध्ये नमुद केल्यानुसार साप्रोयो, २०१३ च्या कालावधीत दिनांक ३१/३/२०१८ पुर्वी अर्ज करण्यास अनुमती देण्यात आली आहे.

३.	वरील बाब विचारात घेता, (१) ज्या विशाल प्रकल्पांना सामूहिक प्रोत्साहन योजना, २००७ अंतर्गत पात्रता प्रमाणपत्र दिले आहे, (२) ज्या विशाल प्रकल्पांना देकारपत्रानुसारसामंजस्य/ करारानुसार अर्जाच्या दिनांकापुर्वीची गुंतवणूक प्रोत्साहनासाठी पात्र धरण्यास शासनाने मान्यता दिली आहे व (३) ज्या विशाल प्रकल्पांनी देकारपत्रसामंजस्य/ करारामध्ये नमूद केल्याच्या दिनांकापासून गुंतवणूकीस सुरुवात केली आहे, असे प्रकल्प वगळता, यापुर्वी ज्या विशाल प्रकल्पांना वरील परिच्छेद १ मध्ये नमुद केल्यानुसार गुंतवणूक कालावधी देकार पत्रानुसारसामंजस्य/ करारानुसार देय केला असला तरी अशा प्रकल्पांना त्यांनी सामूहिक प्रोत्साहन योजना, २००७ मधील परिच्छेद ४.१ मध्ये व सामूहिक प्रोत्साहन योजना, २०१३ मधील परिच्छेद ७.१ (३) मध्ये नमुद केल्यानुसार सर्व परिणामकारक टप्पे पूर्ण करुन अंमलबजावणी यंत्रणेकडे पात्रतेसाठी केलेल्या अर्जाच्या दिनांकापासून गुंतवणूक कालावधी देण्यात यावा.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०८१२१५२६५८५११० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

Damodar Ambadas Kulkarni

Digitally signed by Damodar Ambadas Kulkarni
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy & Labor, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Damodar Ambadas Kulkarni
Date: 2013.08.14 11:33:34 +05'30'

( दा.अं.कुलकर्णी )
शासनाचे अवर सचिव.

प्रति,

विकास आयुक्त (उद्योग(, उद्योग संचालनालय, मुंबई.